महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ग्रेड पे रु. ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्याची सूधारीत पदस्थाना..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायिक-२०१७/प्र.क्र.४०४/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकूल इमारत, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीखः १६ ऑक्टोबर, २०१७

वाचा :- शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमाक-बदली-२०१७/प्र.क्र.२०२/सेवा-३ दि.३१.०५.२०१६

शासन आदेश :-

डॉ. प्रशांत किशनराव वाडीकर, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, उप जिल्हा रुग्णालय, दौंड, जि. पुणे यांची उक्त संदर्भाधीन आदेशान्वये सामान्य रुग्णालय अलिबाग जि. रायगड येथे बदली करण्यात आली होती. सदर बदली आदेशाच्या विरोधात डॉ. वाडीकर यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई येथे मूळ अर्ज क्र.७५४/२०१७ दाखल केला होता. सदर मूळ अर्जाच्या अनुषंगाने मा. न्यायाधीकरणाने दि.२८/०८/२०१७ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन उपरोक्त संदर्भाधीन दि.३१.०५.२०१६ च्या आदेशान्वये डॉ. वाडीकर, वैद्यकीय अधिकारी यांची सामान्य रुग्णालय अलिबाग, जि. रायगड येथे करण्यात आलेली बदली याद्वारे रद्द करण्यात येत असून, त्यांची सुधारीत पदस्थापना उप जिल्हा रुग्णालय, दौंड, जि. पुणे येथे करण्यात येत आहे. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या दि.२८/०८/२०१७ रोजीच्या आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात येणाऱ्या अपिलाच्या निर्णायास अधिन राहून सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) आणि ४ (५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. संबंधितांनी डॉ. वाडीकर, वैद्यकीय अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी त्वरित रुजू करुन घ्यावे व सदर वैद्यकीय अधिकारी यांनी रुजू अहवाल संबंधितांस तसेच शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१११२५३११३४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c0ff0607bc973d9663171bd9b8a9b9ab8cb569b155f9653d1180a4549819299, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2017.10.16 16:17:17 +05'30'

(स. ह. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२) उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे.
३) जिल्हा शल्यचिकित्सक, पुणे.
४) महालेखापाल, १/२ (लेखा व परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
५) जिल्हा कोषागार अधिकारी पुणे.
६) वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय दौंड, जि. पुणे.
७) डॉ. प्रशांत किशनराव वाडीकर, वैद्यकीय अधिकारी.
(उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे यांचे मार्फत)
८) सादरकर्ता अधिकारी, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई.
९) निवडनस्ती सेवा-३.